खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया
इथे स्कॅन करा
Plz Scan
Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १७१, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०२ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# निर्मला सीतारामन यांनी सादर केला केंद्रीय अर्थसंकल्प !

**काय स्वस्त होणार?**

कपडे, चामड्याच्या वस्तू, सिंथेटिक पादत्राणे, चामड्याचे उत्पादने

१७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त, लिथियम-आयन बॅटरी, मोबाइल बॅटरी स्वस्त होणार, सौर ग्लास स्वस्त होणार, मिश्र वायू सीएनजी, ईव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, विमान इंधन, परदेश प्रवास.

**काय महागणार?**

याव्यतिरिक्त, ज्या क्षेत्रांमध्ये कस्टम ड्युटी वाढवल्या गेल्या आहेत, म्हणजेच ज्या वस्तू अधिक महाग होणार आहेत त्यामध्ये दारू, भंगार, सिगारेट खनिजे आणि पीव्हीसी फ्लेक्स शीट यांचा समावेश आहे.

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पासह त्यांनी एक विक्रम प्रस्थापित केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी सकाळी ११ वाजता देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पासह, त्या सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री बनल्या. मोदी सरकारच्या या अर्थसंकल्पाकडून लोकांच्या अनेक अपेक्षा आहेत. काय स्वस्त होईल आणि काय महाग होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी सांगितले की, विशेषतः भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंवरील सीमाशुल्क कमी केले जात आहे. काही वस्तूंचा संदर्भ देत त्या म्हणाल्या की, चामडे आणि कापडांची निर्यात देखील शुल्कमुक्त असेल आणि या वस्तूंवरील सीमाशुल्क कमी केले जात आहे. संरक्षण क्षेत्रात मूलभूत सीमाशुल्क माफ केले जातील.



संसदेत भाषणादरम्यान अर्थसंकल्पीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या, आत्मनिर्भरता हे आपले मार्गदर्शक तत्व असल्याने, आम्ही देशांतर्गत उत्पादन क्षमता, ऊर्जा सुरक्षा आणि आवश्यक आयातीवरील अवलंबित्व कमी केले आहे. त्याच वेळी, आम्ही सरकारच्या प्रत्येक कृतीचा नागरिकांना फायदा मिळावा याची खात्री केली आहे. रोजगार निर्मिती, कृषी उत्पादकता सुधारण्यासाठी, घरगुती खरेदी शक्ती सुधारण्यासाठी आणि लोकांना सार्वत्रिक सेवा प्रदान करण्यासाठी सुधारणा लागू करण्यात आल्या आहेत. या उपाययोजनांमुळे सुमारे ७% उच्च विकास दर झाला आहे आणि गरिबी कमी करण्यास आणि आपल्या लोकांचे जीवन सुधारण्यास लक्षणीय मदत झाली आहे.

---

## केंद्रीय अर्थसंकल्पात विकास, रोजगार आणि सुधारणा यावर भर

**अक्षराज : चंदन सिंह**

**दि.०१, मुंबई :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर केला. 'विकसित भारत' या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करताना आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, एमएसएमई, करसुलभीकरण आणि सामाजिक समावेशन यांवर या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे.अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सरकारच्या तीन कर्तव्यांवर प्रकाश टाकला(१) आर्थिक वाढ गतीमान व टिकाऊ करणे, (२) नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करून क्षमताविकास करणे आणि (३) सबका साथ, सबका विकास या तत्त्वानुसार सर्वसमावेशक प्रगती साधणे.

**भांडवली खर्चात वाढ !**

अर्थसंकल्पात सार्वजनिक भांडवली खर्च ₹१२.२ लाख कोटींवर नेण्याची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे रस्ते, रेल्वे, बंदरे, लॉजिस्टिक्स आणि शहरी पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक होणार आहे. खासगी गुंतवणुकीला चालना देण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर रिस्क गॅरंटी फंड स्थापन करण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला.

**उद्योग व उत्पादन क्षेत्राला चालना !**

जैव-फार्मा, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स घटक, दुर्मिळ खनिजे, रसायने, भांडवली वस्तू आणि वस्त्रोद्योग अशा सात धोरणात्मक क्षेत्रांमध्ये उत्पादनवाढीसाठी नवीन योजना जाहीर करण्यात आल्या. बायोफार्मा शक्ती योजनेसाठी ₹१०,००० कोटी तर कंटेनर



उत्पादनासाठी ₹१०,००० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**एमएसएमईसाठी मोठी घोषणा !**

लघु व मध्यम उद्योगांसाठी ₹१०,००० कोटींचा 'एसएमई ग्रोथ फंड' स्थापन केला जाणार आहे. ढळशृड प्लॅटफॉर्मद्वारे देयक सुलभता, क्रेडिट गॅरंटी आणि व्यावसायिक सहाय्य यामुळे एमएसएमईंच्या तरलतेत वाढ होणार आहे.

**शहरे, रेल्वे व हरित उपक्रम !**

टियर-२ व टियर-३ शहरांसाठी सिटी इकॉनॉमिक रिजन विकसित करण्याची योजना, तसेच मुंबई-पुणेसह सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉर जाहीर करण्यात आले. कार्बन कॅप्चर, वापर व साठवण (उउणड) साठी ₹२०,००० कोटींची तरतूद करून हरित संक्रमणाला गती देण्यात आली आहे.

**सेवा क्षेत्र, शिक्षण व कौशल्य !**

आरोग्य, पर्यटन, आयुष, डिझाइन, एव्हीजीसी (ॲनिमेशन-गेमिंग) आणि शिक्षण क्षेत्रात नवीन उपक्रम जाहीर झाले. एज्युकेशन-टू-एम्प्लॉयमेंट समिती स्थापन करून कौशल्यविकासाला दिशा देण्यात येणार आहे.

**कर सुधारणा व करसुलभता !**

नवीन आयकर कायदा २०२५ १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. टीडीएस/टीसीएस दरात सुलभता, रिटर्न दाखल करण्याच्या मुदतीत बदल, दंड-प्रक्रियांचे सुलभीकरण आणि लघु करदात्यांना दिलासा देणाऱ्या तरतुदी जाहीर करण्यात आल्या.

**राजकोषीय शिस्त !**

राजकोषीय तूट ४.३% पर्यंत ठेवण्याचा अंदाज असून कर्ज-जीडीपी प्रमाण घटवण्यावर भर देण्यात आला आहे. राज्यांसाठी ₹१.४ लाख कोटी वित्त आयोग अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा विकासाभिमुख, रोजगारनिर्मितीला चालना देणारा आणि करदात्यांसाठी सुलभता वाढवणारा असल्याचे चित्र आहे.

## शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणणारा अर्थसंकल्प : खा. प्रतिभा धानोरकर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** आज सादर झालेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचा सुकाळ व आश्वासनांचा पाऊस आहे. प्रत्यक्षात मात्र हा अर्थसंकल्प सामान्यांच्या तोंडाला पानं पुसणारा आणि ठराविक राज्यांवर डोळा ठेवून आखलेला एक ' राजकीय अजेंडा' आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली 'पेरणी' आहे. हमीभावाचा (एमएसपी) मुद्दा अद्याप अधांतरी आहे. खतांच्या किमती वाढल्या आहेत, पण शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळवून देण्याची कोणतीही हमी या अर्थसंकल्पात दिसत नाही. शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणणारा अर्थसंकल्प असल्याची टीका खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली.

पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, आणि केरळ या राज्यांमध्ये निवडणूका घातल्या आहेत. म्हणूनच अर्थमंत्र्यांनी या राज्यांसाठी तिजोरीचे दरवाजे उघडल्याचे नाटक केले आहे. हा देशाचा अर्थसंकल्प नसून भाजपचा निवडणूक जाहीरनामा वाटत आहे. इतर राज्यांनी काय पाप केले आहे? असा सवाल खा. प्रतिभा धानोरकर यांनी केला.

**महागाई आणि मध्यमवर्गीयांची निराशा**

पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरच्या किंमतीनी सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे.या अर्थसंकल्पातून महागाई कमी करण्यासाठी कोणतेही 'रोडमॅप' दिलेली नाही. प्राप्तीकरात सवलत मिळेल ही मध्यवर्गियांची आशा पुन्हा एकदा फोल ठरली आहे. सरकारने केवळ आकडेवारीचा खेळ मांडला असून, सामान्यांचा खिसा रिकामाच राहणार आहे. देशातील बेरोजगारीचा दर उच्चांकी असताना, नवीन रोजगार निर्मितीसाठी कोणतीही ठोस तरतूद नाही. स्टार्टअपच्या नावाखाली तरुणांना केवळ स्वप्ने विकली जात आहेत, अशी टीका त्यांनी केली.

---

## केंद्रीय अर्थसंकल्प : धाराशिव जिल्ह्यासाठी गेमचेंजर - आ.राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०१, धाराशिव :** टेक्निकल टेक्स्टाईल पार्क, एमएसएमई पार्क आणि तीर्थक्षेत्रांच्या कायापालटातून जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. नव्या उद्योगांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटनाला उभारी देणे आणि दळणवळणाची सक्षम जाळे निर्माण करण्याचे जे ध्येय आपण ठरवले होते त्याला या अर्थसंकल्पामुळे मोठी ताकद मिळाली आहे. छोट्या शहरांच्या विकासाच्या कार्यक्रमाला अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे आता नवी गती मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पामुळे धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे. उद्योग आणि पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठी रोजगार निर्मिती होईल. या अर्थसंकल्पामुळे धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक आणि पर्यटन विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. टेक्सटाईल पार्क, एमएसएमई (चडचए) हब आणि तीर्थक्षेत्र विकास या त्रिसूत्रीमुळे जिल्ह्यात रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध त्यातून उपलब्ध होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

कौडगाव एमआयडीसीमध्ये प्रस्तावित असलेल्या टेक्निकल टेक्सटाईल पार्कमुळे मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या कापसावर जिल्ह्यातच प्रक्रिया होईल, त्यामुळे कच्च्या मालाला चांगला भाव मिळेल. उद्योगस्नेही तरतुदींम ुळे गारमेंट युनिट्स आणि प्रक्रिया उद्योगात स्थानिक महिला व सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला हक्काचे काम मिळेल. एमएसएमई (चडचए) पार्कसाठी अर्थसंकल्पात दहा हजार



कोटी रुपयांची अर्थसंकल्पात भरघोस तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर वडगाव एमआयडीसीत प्रस्तावित एमएसएमई (चडचए) पार्कमध्ये स्थानिक उद्योजकांना भांडवल आणि तांत्रिक बळ मिळेल.

आणि धाराशिव जिल्हा भविष्यात लघु उद्योगांचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास येईल असेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

लोथल, धौलावीरा, राखीगढ़ी यांसारख्या १५ पुरातत्त्वीय स्थळांना 'अनुभवजन्य सांस्कृतिक पर्यटन' केंद्र म्हणून विकसित करण्याचा अर्थसंकल्पीय प्रस्ताव म्हणजे तेर येथे आपण सुरू केलेल्या कामालाच राष्ट्रीय पातळीवर मिळालेली मान्यता आहे. तेरच्या पुरातन वारशाचे जतन, सादरीकरण आणि पर्यटनम ूल्य वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या निर्णयामुळे अधिक बळ मिळणार असून, पर्यटनवाढ, स्थानिक रोजगारनिर्मिती, मार्गदर्शक-हस्तकला-सेवा क्षेत्राला चालना मिळणार असून तेरचे सांस्कृतिक महत्त्व जागतिक नकाशावर ठळकपणे मांडले जाणार आहे.

केंद्र सरकारच्या 'टेम्पल टाऊन' संकल्पनेचा सर्वाधिक लाभ तीर्थक्षेत्र तुळजापूरला होणार आहे. धार्मिक पर्यटनासोबतच दर्जेदार रस्ते, निवास व्यवस्था आणि स्वच्छता आदी पायाभूत सुविधांचा विकास होणार आहे. नॅशनल डिजिटल नॉलेज ग्रिड'च्या माध्यमातून तुळजापूर संस्थान, नळदुर्ग किल्ला आणि प्राचीन तेरच ऐतिहासिक वारसा जागतिक पातळीवर पोहचणार आहे. आय.आय.एम. (खखच) च्या सहकार्याने १० हजार पर्यटन मार्गदर्शक तयार केले जाणार आहेत. तुळजापूर, तेर, आणि येडशी येथील तरुणांना यात प्राधान्याने समाविष्ट करण्यात येणार आहे.

मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे धाराशिवच्या दळणवळणाला नवी दिशा मिळणार आहे. यामुळे केवळ प्रवास जलद होणार नाही, तर व्यापार आणि सेवा क्षेत्रालाही मोठी गती मिळणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

**शेती, उद्योग आणि पर्यटनाला बळकटी**

नव्या पर्यटन धोरणामुळे आणि औद्योगिक तरतुदींमुळे धाराशिव जिल्हा आता केवळ एक कृषीप्रधान जिल्हा न राहता, एक महत्त्वाचे औद्योगिक आणि सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित होणार आहे.

हा अर्थसंकल्प धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे. शेती, उद्योग आणि पर्यटन या तिन्ही क्षेत्रांतून जिल्ह्याची अर्थव्यवस्था मजबूत होईल आणि शाश्वत विकासाचे स्वप्न साकार होईल असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# मुंबईतील पालकांवर अपहरणकर्त्यांची दहशत



गेल्या काही महिन्यांत मुंबईतून मुले-मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. मुला-मुलींचे बेपत्ता होण्यामागे प्रामुख्याने दोन कारणे सांगितली जातात यापैकी एक म्हणजे मुला-मुलींचे अपहरण होणे आणि दुसरे म्हणजे कौटुंबिक कारणामुळे किंवा निराशेमुळे मुलांनी घर सोडून निघून जाणे. जून २०२५ पासून मुलांच्या अपहरणाच्या प्रकरणांची मुंबई पोलिसांत नोंद होण्याचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे. अपहरण झालेल्या किंवा घर सोडून निघून गेलेल्या प्रकरणांत मुलांना शोधण्यात पोलिसांना ९८ टक्के यश आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत असले तरी पालकांमध्ये मागील ६ म हिन्यात अपहरणकर्त्यांविषयी मोठ्या प्रमाणात दहशत पसरली आहे. ही दहशत दूर करण्याचे आव्हान आज मुंबई पोलिसांपुढे आहे.

दोन दिवसांत मुंबईतील विविध पोलीस ठाण्यात १२ मुलांचे अपहरण झाल्याची तकार नोंदवण्यात आली आहे. या १२ मुलांमध्ये ८ अल्पवयीन मुलींचा सम ावेश आहे. मुंबईतील शिवाजी नगरमधून ४, ओशिवरा भागातून १, साकीनाका परिसरातून २, मानखुर्द, बांगूर नगर आणि घाटकोपर येथून प्रत्येकी एक मूल बेपत्ता झाले आहे. जून ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुंबईतून एकूण १४५ मुले बेपत्ता झाली आहेत ज्यामध्ये ९३ मुलींचा समावेश आहे. डिसेंबर २०२५ प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ या दहा महिन्यांच्या कालावधीत मुंबईतून ११८७ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची नोंद पोलीस दरबारी करण्यात आली आहे याचाच अर्थ मुंबईतून दिवसाला ४ ते ५ अल्पवयीन मुली गायब होत आहेत. मुंबईतील गर्द वस्तीच्या झोपडपट्या, बाजार, रेल्वे स्थानक, बस डेपो, रहदारीचे रस्ते, शाळा परिसर अपहरणकर्त्यांच्या टार्गेटवर असून अशा ठिकाणी लहान मुलांना सावज केले जाते. मुलांचे अपहरण करून खंडणीसाठी त्यांच्या पालकांना फोन केल्याची नोंद नसल्याने या सर्वांमागे मानवी तस्करी हे एक कारण असू शकते असे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. बेपत्ता होणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे. लहान मुलांचे अपहरण करून त्यांच्यासोबत काय काय केले जाते याबाबतची सविस्तर माहिती स्लमडॉग मिलिनिअर सारखे चित्रपट किंवा क्राईम पेट्रोल सारख्या मालिकांमधून पालकांना अवगत असल्याने सध्या पालकांम ध्ये कमालीची दहशत आहे. अपहरणाच्या वाढत्या प्रकरणामुळे अनेक पालकांनी आपल्या पाल्यांना स्कुल बसमधून शाळेत पाठवणे बंद केले असून मुलांना शाळेत सोडायला आणि आणायला स्वतः जायला सुरुवात केली आहे. काहींनी त्यासाठी परिचयातील माणसे नेमली आहेत. मुलांना खेळायला बाहेर जायला मनाई केली जात आहे. बाहेर एकटे दुकटे फिरण्यासही मुलांना मज्जाव करण्यात येत आहे. मुलांना खेळायला बाहेर सोडताना पालकही त्यांच्यासोबत जाऊ लागले आहेत. शालेय सहलींना अनेक पालकांनी आपल्या मुलांना यंदा पाठवलेले नाही.

अन्य मित्रमंडळींसोबत मुलांना बाहेर सोडल्यावरही आपले बाळ केव्हा परतते याकडे पालक डोळे लावून बसलेले असतात. अपहरण केलेल्या बहुतांश मुला-मुलींना शोधून काढण्यात पोलिसाना यश आले असले तरी अपहरणाची प्रकरणे कमी न होता उलट वाढलेली आहेत त्यामुळे बालकांमधील भीतीही तितकीच वाढलेली आहे. आजतागायत अपहरण झालेल्या आणि सापडलेल्या मुलांच्या प्रकरणांत मुलांनी अटक केलेले अपहरणकर्ते, मुंबई पोलिसांचे शहरभर पसरलेले खबऱ्यांचे जाळे, गुप्तहेर तसेच अन्य सोर्स यांच्या मदतीने अपहरण कर्त्यांचे नेटवर्क एव्हाना उध्वस्त व्हायला हवे होते.

मात्र तसे झालेले नाही त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुलांच्या पालकांमध्ये अपहरणकर्त्यांविषयीचे भय दिवसागणिक वाढत आहे. अल्पवयीन मुला मुलींच्या अपहरणाची प्रकरणे आता नवी मुंबई, ठाणे, भिवंडी परिसरातही घडू लागली आहेत. लहान मुलनाच्या अपहरणाचे हे भय वेळीच दूर केले नाही तर अपहरणकर्त्यांचे धाडस आणखी वाढून ते अन्य जिल्ह्यांतही आपले सावज शोधू लागतील. त्यामुळे पोलीस प्रशासनाकडे याकडे गांभीर्याने लक्ष देऊन मुंबईसह आजूबाजूच्या शहरांत कार्यरत झालेल्या अपहरणकर्त्यांच्या टोळ्या गजाआड कराव्यात.

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनम ध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल.

महिला व बालविकास विभागाच्या ताज्या अहवालानुसार राज्यात गेल्या सात वर्षात तब्बल ६४२८ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. म्हणजेच या हजारो चिमुरड्यांना बालवयातच बोहल्यावर चढवले जाणार होते. होऊ घातलेले हे हजारो बालविवाह रोखल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदनच करायला हवे. आकडेवारीतील ही प्रचंड वाढ प्रशासनातील सतर्कता दर्शवत असली तरी ग्रामीण भागातील बाल विवाहाची मानसिकता अद्याप बदललेली नाही हेच यातून अधोरेखित होते. मागील आठवड्यात एका पंधरा वर्षाच्या दहावीतील मुलीने तिचा होऊ घातलेला विवाह रोखण्यासाठी मुख्याध्यापकांना पत्र लिहिले होते याचाच अर्थ प्रशासनाने प्रयत्न करूनही राज्यात बालविवाह होतच आहेत.

मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत प्रकाशित झालेल्या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाच्या सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले होते. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे.



बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले होते याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या दहा हजारांहून अधिक आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे.

मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. सरकारने मंजूर केलेल्या या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंम लबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते.

बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वानाच जागृत करणे गरजेच आहे.

भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# 'विकासाच्या विवरा'चा बळी



देशाची राजधानी दिल्लीची अंगण-ओसरी म्हणवल्या जाणाऱ्या ग्रेटर नोएडातल्या युवराज मेहता या एका तरुण आयटी इंजिनिअरसाठी १६ जानेवारीची रात्र शब्दशः काळरात्र ठरली. त्या थंड, दाट धुक्याच्या रात्री, गुरुग्राममधल्या आपल्या बहुराष्ट्रीय कंपनीतून २७ वर्षीय युवराज आपल्या कारनं घरी परतत होता. ग्रेटर नोएडातल्या सेक्टर १५० परिसरात रस्त्याच्या कडेला अनेक महिन्यांपासून एक ७० फूट खोल खड्डा (खड्डा कसले, विवरच) उघडा होता. एका खासगी रिअल इस्टेट प्रकल्पाच्या बेसमेंटसाठी बेकायदा खोदलेल्या, नियम आणि सुरक्षा मानके धुडकावून तसाच सोडलेल्या या खड्ड्यात मग सांडपाणी भरून त्याला घाणेरड्या तलावाचं स्वरूप आलं होतं.

दाट धुकं, अंधार आणि रस्त्यावरच्या ९० अंशांच्या एका धोकादायक वळणामुळे युवराजची गाडी थेट पाण्याने भरलेल्या त्या विवरात कोसळली. घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी सांगितल्यानुसार, गाडी पाण्यात बुडाल्यावरही युवराज काही काळ जिवंत होता. त्यानं स्वतःला वाचवण्यासाठी त्या बर्फासारख्या थंड पाण्यात गाडीच्या छतावर चढण्याचा प्रयत्न केला आणि मदतीसाठी दोन तास जिवाची अक्षरशः भीक मागितली. खड्ड्याच्या काठावर जमलेले पोलिस, बघे, खराब नावेसह आलेले उत्तर प्रदेश आपत्ती निवारण दलाचे आणि फाटकी लाइफ जॅकेट असलेले अग्निशमन दलाचे जवान असा किमान ८० जणांचा जमाव तिथं होता. पण त्यातल्या एकानंही पाण्यात उतरण्याची हिंमत केली नाही. पाहता पाहता युवराज मध्यरात्री साडेबाराला जग सोडून गेला.

गाझियाबादमध्ये राहणारा युवराज त्या काळरात्री गुरुग्राममधून नोएडाला ७० किलोमीटर गाडी चालवून येत होता. का? कारण मेट्रो जीवनवाहिनी वगैरे असलेल्या दिल्लीला खेटून असलेल्या ग्रेटर नोएडात भरवशाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नावाचा प्रकारच नाही. १६ तारखेला घडलेल्या या घटनेबाबत नोएडा प्रशासनाला व बाबूंना जाग आली दोन दिवसांनी, १८ जानेवारीला. तेही प्रसार माध्यमांनी या संदर्भात आवाज उठवला म्हणून.

'लिंचिंग' म्हणजे झुंडबळी हा शब्द आजच्या उत्तर प्रदेशसाठी नवा नाही. प्रशासकीय बेपर्वाई, नावापुरतंच बचाव कार्य आणि विस्कळित – असंवेदनशील यंत्रणेच्या ढिलाईमुळे झालेला युवराजचा मृत्यू हा 'लिंचिंग'च आहे, अशी खणखणीत भूमिका महाराष्ट्र टाइम्सचं भावंड असलेल्या 'नवभारत टाइम्स'नं घेतली. शवविच्छेदन आणि प्राथमिक तपासात हे स्पष्ट झालं, की नियमांचं पालन झालं असतं आणि यंत्रणांनी थोडी जरी जबाबदारी घेतली असती तर युवराजचा मृत्यू नक्की रोखता आला असता. हा केवळ एक अपघात नाही, तर विकास, रिअल इस्टेट आणि प्रशासन यांच्यातील 'अनैतिक संबंधां'मुळे दिल्ली-एनसीआरमध्ये वर्षानुवर्षे बहरलेल्या, पण सडलेल्या-कुजलेल्या व्यवस्थेचं नग्न सत्य आहे. ते महाराष्ट्रासह देशभरातही दिसतं. दिल्लीतल्या बसथांब्यावरही 'उत्तम प्रदेशा'च्या जाहिराती ओसंडून वाहत असतात. प्रत्यक्षात 'माणूस झाला सस्ता' हे सत्य कसं आहे, याचं हे एक छोटंसं आणि प्रकाशात आलेलं उदाहरण. युवराजचा जीव घेणाऱ्या 'एमझेड विझटाऊन', 'लोटस ग्रीन कन्ट्रक्शन्स' आदी कंपन्यांचे अभयकुमार, रवि बन्सल, सचिन करनवाल या बिल्डरांची धरपकडही केवळ प्रसार माध्यमांच्या दबावातून झाली, असं म्हणण्यास पुरेपूर वाव आहे. युवराजची कार पाण्यातून काढण्यासाठी दुसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता मोहीम सुरू झाली व संध्याकाळी साडेसहाला संपली. स्थानिक रहिवाशांनी यापूर्वी या धोकादायक खड्ड्याबद्दल तक्रारी केल्या होत्या; परंतु प्रशासनानं त्यांची दखलच घेतली नाही, हेदेखील समोर आलं. मीडिया आणि जनतेचा दबाव वाढल्यावर पोलिसांनी या अभयकुमारला अक्षरधाम खेळगाव परिसरातल्या आलिशान घरातून अटक केली, तेव्हाही तो वरपर्यंत असलेल्या संबंधांमुळे पळून जाण्याचाच प्रयत्न करत होता. अभयकुमारच नव्हे तर नोएडाच्या जिल्हाधिकाऱ्यांनाही वाचविण्याचे प्रयत्न सरकारच्या उच्चपदस्थांनी चालविल्याचा विरोधी पक्षांचा आरोप केवळ राजकीय म्हणून सोडून देता येणार नाही. अभयकुमारच्या कंपन्यांवर नोएडा प्राधिकरणाचे हजारो कोटी रुपये थकले होते; तरीही त्यांना बांधकाम सुरू ठेवण्यास मोकळं रान देण्यात आलं ही वस्तुस्थिती अनेकांची अभद्र युती दर्शवते. युवराज मेहताचा मृत्यू ही केवळ एका कुटुंबासाठी वैयक्तिक शोकांतिका नाही, तर संपूर्ण देशासाठी एक इशारा आहे. बांधकाम नियम धाब्यावर बसवून, पर्यावरणीय आणि सुरक्षा मानकांकडंही दुर्लक्ष करून उभं असलेलं दिल्ली-एनसीआर नामक विकास मॉडेल किती अमानवी झालं आहे, हेही यातून दिसतं. युवकांच्या मतांसाठी कायम झोळी पसरली जाते. पण इथं अवघ्या २७ वर्षांचं एक स्वप्न दोन तास मृत्यूशी झुंज देत होतं, जीवाची याचना करत होतं, तरी आमच्या 'व्यवस्थेनं' त्याला बुडताना प्रेक्षकाच्याच भूमिकेतच धन्यता मानली का?

दुर्दैवानं, ही अशा प्रकारांतील शेवटची दुर्घटना नाही. उद्या, कधी तरी, दिल्लीत नाही तर मुंबई- ठाणे-पुण्यात-नाशकात किंवा नागपूर-संभाजीनगर वगैरेत याची पुनरावृत्ती होईल किंबहुना होतंही असेल. युवराजच्या मृत्यूवरून एखाद-दुसऱ्या बाबूची बदली होईल. दुसरी समिती निर्जीव अहवाल देईल. एक किंवा दोन जणांना निलंबित केलं जाईल आणि मग पुढच्या 'युवराज'च्या बुडण्याची वाट पाहणं सुरू होईल.

# शपथविधीची एव्हढी घाई का ?

राज्याचे धुरंधर नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक जाण्याने पवार कुटुंबियांसह राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला ज्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा प्रसारही थांबला. दुसरीकडे राष्ट्रवादी पक्षात मात्र तात्काळ खलबते सुरु झाली आणि अजित पवार गटाच्या नेत्यांनी पक्षाची धुरा सुनेत्राताई पवार यांच्याकडे देण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्रीपदासाठीही त्यांचेच नाव पुढे करण्यात आले. उपमुख्यमंत्रीपदासाठी घाईने सुनेत्राताईंचे नाव पुढे करताना पवार कुटुंबाचे मत विचारात घेतले नसल्याचे आणि भविष्यात त्याचा परिणाम सत्तेतील राष्ट्रवादी पक्षाच्या सहभागावर होणार असल्याचे सूतोवाच शरद पवार यांनी आपल्या १५ मिनिटांच्या भाषणात केले.

त्यामुळे पुढे सत्ता गेली किंवा चुकीचे निर्णय झाले तर त्याला पवार कुटुंब जबाबदार नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. एकूणच काय तर एवढ्या मोठ्या नेत्याच्या जाण्याने जनता दुःखात असताना राजकीय मंडळींचे राजकारण मात्र जोमाने सुरु झाले आहे. सामान्य घरातही कुटुंबातील कोणी गेले कि १२ दिवस दुःख पाळले जाते. एक वर्षाच्या कालावधीत घरात कोणतेही शुभकार्य केले जात नाही. याठिकाणी मात्र दुखवट्याचे तीन दिवस संपताच सुनेत्राताईंना तातडीने मुंबईला बोलावून उपमुख्यमंत्री पदाची शपथ देण्यात आली. उपमुख्यमंत्रीपद महत्वाचे असले तरी राज्याला याआधीच एक उपमुख्यमंत्री आहेत मग दुसऱ्या उपमुख्यमंत्रीपदासाठी १२ दिवस थांबता आले नसते का ? राज्यातील समस्त महापालिकांच्या निवडणुका सरकारने साडेतीन वर्ष लांबवल्या मग उपमुख्यमंत्रीपदासाठी एव्हढी घाई नेमकी कशासाठी असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## माझे बजेट

बजेट भाषण ऐकून
गेलो आम्ही हूरळून
दाता केवढा उदार
गेलो पार विरघळून

दे भर भरून वरून
खालून घेता काढून
पायावरली रे चादर
तोंडावर घेई ओढून

हातात नुरले काही
नंतर येणारं कळून
जमा खर्च व्यस्त ते
गणिते आण जुळून

मोठमोठ्याशब्दांचा
वर्षाव मस्त करून
तळे राहिले कोरडे
मनचं गेलेयं भरून

योजना गोंडस छान
पैसा आणता कुठून
ओल जाता वाळून
झाडं जाणार वठून

महागाई वरी रूसून
इंडेक्स बसला हटून
डोले अर्थ व्यवस्था
बसला कसा खेटून

स्वतः सावरू स्वतां
बजेट घराचे करुन
आपण सावरू जसे
देश जाईलं सावरुन

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जिल्हा परिषदेच्या शाळा - विद्यार्थ्यांचे आता होणार सोशल ऑडिट

### गणवेश, पुस्तके, शैक्षणिक साहित्य देवूनही गुणवत्ता वाढेना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे आणि शाळांचे सोशल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, समग्र शिक्षा अभियानांतर्गत केंद्राद्वारे शाळांना मोफत पुस्तके, गणवेश व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या साहित्य खरेदीस दरवर्षी मोठी कोट्यावधींची रक्कम दिली जाते. एवढा खर्च करूनही शैक्षणिक गुणवत्ता वाढत नसल्याचा सरकारचा संशय आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरवर्षी नव्या शैक्षणिक वर्ष प्रारंभाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश दिली जातात, शिक्षणाचा दर्जा, गणवेशाचा दर्जा, शिक्षक कसे शिकवतात, साहित्य – सामग्री आहे का,अशा अनेक मुद्दे सोशल ऑडिटमध्ये पाहिले जाणार आहेत. समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांसह खाजगी शाळांनाही मोफत पुस्तके, गणवेश दिले जातात. दरवर्षी यावर मोठी कोट्यावधी निधीची रक्कम खर्च केली जाते. या रकमेचा योग्य विनियोग होतो का ? हे राज्य सरकार पाहणार आहे. सोशल ऑडिट करण्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीसोबत करार केल्याचे सांगण्यात येत आहे. या सोशल ऑडिटमध्ये नेमके काय बाहेर येते ? याकडे आता शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गजांचे लक्ष लागले आहे. विद्यमान परिस्थितीत जिल्हा परिषद शाळांचे हाल आहेत. पट संख्येत झपाट्याने कमी येत आहे. अनेक जिल्ह्यात शिक्षक अतिरिक्त होत आहेत. मोजक्या गुणवंत शिक्षकांच्या शाळा सोडल्या तर गुणवत्तेबाबतही ऐशीतैशीच आहे. त्यामुळे सरकारला चिंता व्यक्त वाटत असून आता शाळा व विद्यार्थ्यांचे सोशल ऑडिट करून खर्च केलेल्या पैशातून नेमके काय साध्य झाले, याची शहानिशा करण्यात येणार आहे.

## सर्वसमावेशक आणि प्रगतीशील अर्थसंकल्प - विलास महल्ले



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा 'विकसित भारत' आणि 'ओबीसी कल्याण' याला गती देणारा आहे असे मत भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हा महामंत्री विलास महल्ले यांनी व्यक्त केले. विश्वकर्मा योजना आणि मुद्रा योजनेच्या विस्तारातून ओबीसी समाजातील कारागीर व उद्योजकांना मोठे पाठबळ मिळेल ग्रामीण रस्ते आणि सिंचनासाठीची तरतूद काटोल मतदारसंघातील शेतीसाठी संजीवनी ठरेल कौशल्य विकास आणि स्टार्टअपला प्रोत्साहन दिल्याने ग्रामीण तरुणांच्या हाताला काम मिळेल शिवाय आयकरात दिलेली सवलत आणि आरोग्य विमा योजनांचा विस्तार सर्वसामान्यांना बळ देणारा आहे. हा अर्थसंकल्प गाव गरीब आणि शेतकरी यांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करणारा असून भारताला आर्थिक महासत्ता बनवणारा आहे.

## प्रचारसभेत कार्यकर्त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, पालम (परभणी) :** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचार सभेत एका कार्यकर्त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना ३१ जानेवारीला पालम तालुक्यातील तांदुळवाडी येथे घडली. रमेश कोंडीबा लांडगे वय ५२, रा. बनवस, ता.पालम हे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीच्या प्रचारात मागील काही दिवसांपासून सक्रीय होते. शनिवारी सकाळी तांदुळवाडी येथील एका प्रचार सभेत त्यांनी भाषण केले. त्यानंतर काही वेळाने त्यांना अस्वस्थ वाटून अचानक त्यांच्या छातीमध्ये वेदना होऊ लागल्या. त्यांना तात्काळ राणीसावरगाव आरोग्य केंद्रात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे बनवस परिसरामध्ये शोककळा पसरली आहे.

## राहुरीत रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्यांवर कडक कारवाई; ६६ वाहनांवर ५१,१०० रुपयांचा दंड



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०१,राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर ते मनमाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या सुरू असल्याने राहुरी शहरात एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र काही वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन करून रॉंग साईडने वाहने चालवली जात असल्याने वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागाने रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष कारवाई करत ६६ वाहनांवर कारवाई करून एकूण ५१,१०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

वाहतूक कोंडीमुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांनी आपली वाहने केवळ एकेरी लेनमध्येच चालवावीत, रॉंग साईडने वाहने आणू नयेत, असे आवाहन राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. अन्यथा भविष्यात अधिक कडक दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. ही कारवाई सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, सोमनाथ वाकचौरे, अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे (राहुरी पोलीस स्टेशन) तसेच वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हवालदार ठोंबरे, दरेकर व फुलमाळी यांनी सहभाग घेतला.

# टाकळीढोकेश्वर येथिल १०० वर्षांची कावड यात्रेची परंपरा आजही कायम

## त्र्यंबकेश्वरहून १७० किमी पायी आलेल्या कावड यात्रेचे स्वागत





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, पंचवटीपासून निघालेल्या बिरोबा पायी कावड यात्रेचे आज रविवारी टाकळी ढोकेश्वर येथे जल्लोषात स्वागत केले. बिरोबा शिवभक्त युवकांनी १७० किमीचे अंतर पायी चालत खांद्यावर घेऊन कावडीने आणले आहे. यावेळी तरुणांनी खांद्यावर कावड घेऊन गावात मिरवणूक काढून कावड यात्रा उत्साहात पार पडली.

या गावचं आध्यात्मिक महत्त्व आणि आध्यात्मिक माहिती तितकीच मोठी आहे. या गावचं ग्रामदैवत असणाऱ्या श्री ढोकेश्वर मूळे हे आध्यात्मिक महत्त्व आहे, त्यामुळेच टाकळीचं दुसरं नाव आणि ओळखही टाकळी ढोकेश्वर अशी आहे. टाकळी गावच्यामध्ये वसलेल्या बिरोबा मंदिराने टाकळी ढोकेश्वरचं आध्यात्मिक विश्व अतिशय समृद्ध केलं आहे.

फेब्रुवारी महिन्यातील माघ (नव्याची) पौर्णिमेला टाकळीत होणारी बिरोबाची कावड यात्रेचं महत्त्व टाकळीकरांसाठी अतिशय महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी असलेल्या टाकळी ढोकेश्वर येथिल प्रसिद्ध कावड यात्रेला १०० वर्षांची परंपरा आहे. आज माघ पौर्णिमेला रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी टाकळी ढोकेश्वर कावड पालखी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. महादेवाच्या जयघोषात साकुरच्या बिरोबाचे चांगभले कावडधारी मंडळासह युवकांनी ही जलाभिषेक केला. पालखी कावड सोहळा पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

कावड यात्रा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. नागरिक व शिवभक्त ढोल ताशा, डफ वाद्यांच्या गजरात आणि महादेवाच्या जयघोषात बिरोबा मंदिरात जाऊन प्रदक्षिणा घालून जलाभिषेक करत दर्शन घेत होते. बिरोबा हे टाकळी ढोकेश्वरचे जागृत देवस्थान आहे. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, गोदावरी नदीच्या काठावर वसलेले पंचवटी कुंभमेळा तीर्थक्षेत्र गोदावरी नदीच्या पाण्याचा अभिषेक पूर्वापार पद्धतीने घेतला जातो. गोदावरी नदीला परिसरात गंगेतकेच महत्त्व आहे. अलीकडच्या काळात गोदावरी नदीचे पाणी कावडीने अनवाणी पायाने आणण्याची एक परंपरा सुरू झाली आहे. आता कावड यात्रा ही टाकळी ढोकेश्वर गावची ओळख बनली आहे.

> १९६० साली या मंडळाने गोदावरी नदीच्या काठावर वसलेले पुणतांबा (ता.कोपरगाव ) चांगदेव महाराज समाधी स्थळ येथील नदीचे पाणी आणून जलाभिषेक केला. त्याच्या पुढील वर्षी पायी जात भोपळ्याच्या कावडीतून प्रवरासंगम येथून गोदावरी नदीचे पाणी कावडीने आणले. जुन्या पिढीतील गणपत तराळ, नानाभाऊ तराळ, धोंडिबा (बाबा) रांधवण, बबन तराळ, शंकर धुमाळ, रामदास झावरे यांनी आपल्या साथीदारांसह दरवर्षी जलाभिषेक करण्याची परंपरा सुरू केली. परतीच्या प्रवासात या कावड यात्रेचा एक नियम म्हणजे एकदा तुम्ही कावड खांद्यावर घेतली की ती खाली ठेवायची नाही, अनवाणी पायाने चालत असताना,दुसऱ्याने दिलेले अन्न पाणी घ्यायचे नाही, असे अनेक पावित्र्य आणि नियम आहेत. या पुढील काळातही ही परंपरा कायम सुरू राहणार आहे.
>
> **– संपत तराळ (बिरोबा कावड मंडळाचे मार्गदर्शक)**

# तस्करांच्या तावडीतून ३० गोवंशाची सुटका

## १७ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; तिघांना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** कंटेनर ट्रकमध्ये कोंबून कत्तलीसाठी तेलंगणा राज्यात नेण्यात येत असलेल्या ३० गोवंशाची पोलिसांनी सुटका केली. याप्रकरणी ३ आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून १७ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कत्तलीसाठी नागपूर येथून तेलंगणाकडे आयशर ट्रक (एच.आर ६९ सी ९६३४) मध्ये काही गोवंश घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहतीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला. यावेळी हा ट्रक येताना दिसताच पोलिसांनी त्याला थांबविले.

ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ३० बैल कोंबून असलेले आढळून आले. जनावरांबद्दल माहिती विचारली असता त्यासंदर्भात संबंधित व्यक्तीकडे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नव्हती. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी संजय पानसे (रा.नारी माळा कॉलनी, नागपूर) ट्रकचालक झनकलाल उर्फ लंबू हृदयसिंग मरकाम (रा.उप्पळवाडी नागपूर) आणि वाहनमालक मुजमील जमील कुरेशी (रा. नागपूर) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी कारवाईत ५ लाख ८५ हजार रुपयांचे गोवंश व १२ लाख रिपये किंमतीचा कंटेनर ट्रक असा एकूण १७ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपिंविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश हत्तीगोटे, विलास कोवे, सचिन गायकवाड, पुनेश्वर कुळमेथे, तसेच स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

### गोवंश तस्करीप्रकरणी ९ जणांविरुध्द गुन्हा दाखल

कोरपना : यवतमाळ जिल्ह्यातून खातेरा- पारडी मार्गे तेलंगणातील कत्तलखाण्याकडे तीन पिकअप वाहनात निर्दयतेने कोंबून नेण्यात येत असलेल्या ७ गोवंशाची पोलिसांनी सुटका केली.

ही कारवाई कोरपना- आदिलाबाद राष्ट्रीय महामार्गावरील मेहंदी फाटा येथे करण्यात आली. या कारवाईत ७ लाख ६५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी अमोल घुगुल, विकास जुनघरे (रा.दोन्ही नेरड, ता.वणी), शेख जिब्रान अखिल शेख (रा.वणी), आकाश उदकवार (रा.पिंपरडवाडी, ता.झरी), संदिप सोयाम (रा.पिपरड, ता.झरी), शंकर आंबोरकर (रा.मुकुटबन, गंगाधर जवादेकर (रा.मुकुटबन) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच २९ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास कातलाबोडी फाटा मार्गे कोरपना येथे कत्तलीसाठी पायदळ घेऊन जात असलेल्या दोन जनावरांची पोलिसांनी नाकाबंदी करुन सुटका केली. याप्रकरणी आरोपी शेख मुनाफ शेख हुसेन, शेख साहिल शेख मुनाफ ( रा.दोघेही रा.कोरपना) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

## वांबोरी बाजारपेठेत पुन्हा चोरट्यांचा धुमाकूळ; जैन मंदिर, ज्वेलर्स व बंद घर फोडले



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०१, वांबोरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील मुख्य बाजारपेठेत चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घालत जैन श्वेतांबर मंदिर, सोन्याचे दुकान व एका बंद घरावर डल्ला मारून लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी पहाटे उघडकीस आली. महिन्याभराच्या अंतराने बाजारपेठेत पुन्हा चोरी झाल्याने व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वांबोरीच्या सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे तीनच्या सुमारास ६ जणांची चोरट्यांची टोळी वांबोरी मुख्य बाजारपेठेत दाखल झाली. जैन श्वेतांबर मंदिराच्या दरवाजाचा पितळी कोंडा कटरच्या सहाय्याने तोडून मंदिरात प्रवेश करून सुमारे १५० किलो वजनाची दानपेटी बाहेर नेण्यात आली. मोकळ्या जागेत दानपेटी फोडून त्यातील सुमारे ८० हजार रुपये रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली आहे.

यानंतर चोरट्यांनी वांबोरी मुख्य बाजारपेठेतील नीरज संतोष शर्मा यांच्या 'शर्मा ज्वेलर्स' या दुकानावर मोर्चा वळवला. दुकानाच्या शटरची कुलपे तोडून चोरट्यांनी चांदीची पेंडल, नाणी, अंगठ्या, ब्रेसलेट, चैन, पैंजण, कर्णफुले व इतर दागिने असा सुमारे एक किलो चांदीचा ऐवज तसेच सोन्याच्या मुलामा दिलेले ३ नेकलेस, ७ अंगठ्या असा एकूण सुमारे ३ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. याचवेळी अनुज पंचारिया यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटाची उचकापाचक केली. मात्र तेथे चोरट्यांच्या हाती काहीच लागले नाही. या घटनेत ६ चोरट्यांची टोळी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून वांबोरी पोलीस दुरुक्षेत्रात गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते. यापूर्वी ६ महिन्यांपूर्वी सुभाषनगर येथील निवृत्त शिक्षक शंकरराव शेवाळे यांच्या घरी चोरी झाली होती. तसेच महिन्याभरापूर्वी वांबोरी बाजारपेठेत धाडसी चोरी झाली होती. त्या गुन्ह्यांचा तपास सुरू असतानाच पुन्हा चोरी झाल्याने पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे यांच्यासह श्वान पथक व ठसे तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीस हेड कॉन्स्टेबल झिने, कॉन्स्टेबल सतीश कुऱ्हाडे, पोलीस नाईक संतोष निकम आदींनी ही घटनास्थळी तपास केला असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

## नमुंमपा महापौर, उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा. होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी आज १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत महापालिका सचिव संघरत्ना खिल्लारे यांचेकडे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत.

महापौर पदासाठी होणाऱ्या निवडणुकीकरिता सरोज रोहिदास पाटील आणि सुजाता सुरज पाटील यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे.

तसेच उपमहापौर पदासाठी होणाऱ्या निवडणुकीकरिता आकाश बाळकृष्ण मढवी आणि दशरथ सिताराम भगत यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे. महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सभा होणार आहे.

# शेवगाव व पाथर्डी तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई

## ३ गुन्हे दाखल; ५० लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३१, अहिल्यानगर :** शेवगाव व पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरीत्या वाळूची चोरी व वाहतूक करणाऱ्या आरोपींविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी मोठी कारवाई करत ३ गुन्हे दाखल करून तब्बल ५० लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक अहिल्यानगर सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतूक विरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ऋकिरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समीर अभंग, राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार हृदय घोडके, दीपक घाटकर, संतोष खैरे, सुयोग सुपेकर, श्यामसुंदर जाधव, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, किशोर शिरसाठ व बाळासाहेब खेडकर यांच्या पथकांनी ही कारवाई केली. दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीत, ३० जानेवारी २०२६ रोजी शेवगाव पोलीस स्टेशन हद्दीत तसेच ३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पुन्हा पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणाऱ्या इसमांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७६/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) अन्वये ४० लाख ५० हजार रुपये किंमतीची ५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून अनिल साहेबराव लबडे (वय ५२, रा.तोंडोळी, ता.पाथर्डी) यास अटक करण्यात आली आहे. डंपर मालक भाऊसाहेब आप्पासाहेब काकडे हा आरोपी फरार आहे.

शेवगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. ६१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) सह गौण खनिज अधिनियम कलम ३/१५ अन्वये ५ लाख १० हजार रुपये किंमतीची १ ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून सुरज परसराम बुटे (वय २०, रा.ढोरजळगाव, ता.शेवगाव) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७७/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे ५ लाख १० हजार रुपये किंमतीची १ ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून सचिन विठ्ठल बडे (वय ३६, रा.येळी, ता.पाथर्डी) याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणात एकूण ३ गुन्हे दाखल करून ४ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली असून एकूण ५० लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अहिल्यानगर सोमनाथ घार्गे यांच्या सूचनांनुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, यापुढे ही जिल्ह्यातील अवैध धंद्या विरोधात स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# नवी मुंबई मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी सातत्यपूर्ण डीप क्लिनिंग मोहिमा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** नवी मुंबईतील हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकामांवरील वायू प्रदूषण नियंत्रणावर विशेष लक्ष देण्याप्रमाणेच हिवाळी कालावधीत हवेत धुक्याबरोबरच धूळीचेही वाढलेले प्रमाण लक्षात घेऊन ठिकठिकाणी डीप क्लीनिंग मोहिमा प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.



यामध्ये 'रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रणा'कडे अधिक काटेकोर लक्ष दिले जात असून त्यासोबतच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने तसेच मोकळ्या जागा साफसफाईची विशेष मोहीम हाती घेण्यात आलेली आहे.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण स्वच्छता विभाग धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी कृतीशील झालेला आहे. त्यासोबतच आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार सर्व विभाग कार्यालयांच्या स्तरावर सहाय्यक आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनानुसार अभियंते व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वच्छता अधिकारी यांची पथके कार्यान्वित करण्यात आली असून सखोल स्वच्छता मोहीमांप्रमाणेच धूळ प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.

या मोहिमेंतर्गत २९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालवधीत साधारणतः ६ टनाहून अधिक धूळ, माती व राडारोडा उचलून नेण्यात आला आहे. प्राधान्याने १२ मुख्य रस्त्यांवर १० कि.मी. पेक्षा अधिक अंतराच्या रस्त्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली आहे. रस्ते हे धूळ, माती उचलून स्वच्छ केल्यानंतर ते जेटींग मशीन व एनकॅप फॉगर्स वाहनांद्वारे धुवून स्वच्छ केले जात आहेत. यांत्रिक सफाई मशीन वाहनांद्वारे दैनंदिन २२३ किमी मुख्य रस्त्याची साफसफाई करण्यात आलेली आहे.

यामध्ये आम्र मार्ग, ठाणे- बेलापूर मार्ग, सायन पनवेल हायवे वाशी, एम आयडीसी क्षेत्रातील गवळीदेव मार्ग, पामबीच मार्ग, कोपरखैरणे – घणसोली पामबीच मार्ग, पामबीच सर्व्हिस रोड, सानपाडा परिसर, तुर्भे वार्ड लुब्रिजोल कंपनी समोरील फायजर रोड, तुर्भे एमआयडीसी रोड, गणपती पाडा मुख्य रस्ता, रबाळे एमआयडीसी, निब्बाण टेकडी ते साईप्रसाद हॉटेल परिसर घणसोली, दिवानाका ते मुरबादेवी चौक रबाळे, घणसोली रस्त्यांची त्याचप्रमाणे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांची व परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली. यापुढेही ही कार्यवाही सुरूच राहणार आहे.

यामध्ये रस्त्याच्या पृष्ठभागाची ब्रशने स्वच्छता करणे व जमा झालेली माती वाहून नेणे, स्वच्छ केलेल्या रस्त्यांवर प्रक्रियाकृत पाणी स्प्रेइंग करुन रस्ते धुणे, रस्त्याच्या कडेला पडलेला बांधकाम राडारोडा यांचे निर्मूलन करणे, पदपथांचीही स्वच्छता करणे अशा विविध प्रकारे सखोल स्वच्छता करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या स्वच्छता कामाकरिता खालीलप्रमाणे साधन सामग्री वापरण्यात येत आहे. यामध्ये –ह जेटींग मशीन – ०८ह यांत्रिक सफाई मशीन – ०७ दैनंदिन साफसफाई ह छअउझ फॉगर्स वाहने – ०५ह फ्लीपर मशीन – १५०ह विशेष डीप क्लिनिंग मोहिमेत सहभागी स्वच्छताकर्मी – २५० हून अधिक. या सोबतीनेच नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील मैदाने तसेच मोकळ्या जागा यांच्या स्वच्छतेची विशेष मोहीम सर्व विभाग कार्यालयांच्या स्तरावर राबविण्यात आली. यामध्ये खालील मैदानांची साफसफाई करण्यात आली. भास्कर घाडी मैदान सेक्टर ५ ऐरोली, कोपरी गावदेवी मैदान तुर्भे, गावदेवी मैदान सेक्टर ५ सानपाडा, कोपरखैरणे सेक्टर ६ ओपन प्लॉट, सेक्टर ५ ते ८ मैदान कोपरखैरणे, रेल्वे स्टेशन कोपरखैरणे पार्किंग, तेथील मोकळा परिसर, सुभाषचंद्र बोस मैदान सेक्टर १ वाशी, जुहू गाव गावदेवी मैदान वाशी, मोकळी मैदाने सेक्टर २९ वाशी, मीनाताई ठाकरे मैदान सेक्टर १६ वाशी, आयसीएल शाळे समोरचे मैदान से १५ वाशी, घणसोली सेक्टर ६ खेळाचे मैदान, घणसोली सेक्टर ७-८ रस्त्याशेजारील मोकळी जागा इत्यादी परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वायु प्रदूषण प्रतिबंधाकडे अधिक गांभीर्याने लक्ष दिले जात असून त्यादृष्टीने वायू प्रतिबंधात्मक कार्यवाही अधिक प्रभावीपणे केली जात आहे.

# भव्य त्रीमंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.०१, बाळकुम (ठाणे) :** शहरातील बाळकुम येथे जीतो संस्था, महावीर जैन ट्रस्ट आणि दादा भगवान फाउंडेशनच्या पुढाकाराने उभारण्यात आलेल्या भव्य त्रिमंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आज संपन्न झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण शहरात धार्मिक एकतेचा, सौहार्दाचा आणि आध्यात्मिक जागृतीचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचे मत याप्रसंगी व्यक्त केले.

या त्रिमंदिरात एकाच छताखाली तीन प्रमुख विचारधारांचे दर्शन घडते. येथे सीमंधर स्वामीजींची प्रतिमा, योगेश्वर श्रीकृष्ण भगवान आणि भव्य शिवलिंग विराजमान असून या तीनही मूर्ती मनाला शांती आणि आनंद देणाऱ्या आहेत. या अनोख्या संकल्पनेमुळे कोणताही भाविक येथे आला, तरी हे माझेच मंदिर आहे अशी भावना त्याच्या मनात निर्माण होत असल्याचे यावेळी नमूद केले.

या मंदिरामुळे ठाण्याची भूमी अधिक पवित्र झाली असून, शहराची ओळख आता केवळ औद्योगिक किंवा सांस्कृतिक शहर म्हणून नव्हे, तर धार्मिक आणि आध्यात्मिक केंद्र म्हणूनही दृढ होत आहे. आजचा हा सोहळा केवळ ठाण्यासाठी नाही, तर महाराष्ट्र आणि संपूर्ण देशासाठी अभिमानाचा क्षण आहे असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मत याप्रसंगी व्यक्त केले. हे केवळ मंदिर नाही, तर संपूर्ण विश्वासाठी आध्यात्मिक एकतेचे प्रतीक आहे. विविध धर्म, पंथ आणि विचारधारांचे प्रतिनिधित्व करणारे हे त्रिमंदिर मानवतेला सुख देण्याचा आणि अहिंसा, सत्य, आत्मशुद्धी, मोक्षप्राप्ती या समान मूल्यांवर आधारित मार्ग दाखवेल असे यावेळी अधोरेखित केले. याप्रसंगी जैन समाजाचे दीपकभाई पारेख तसेच जैन समाजातील सदस्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, देश-विदेशातून आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १० हजार स्वाक्षऱ्यांचा टप्पा पार 'सेव्ह लोहरडोंगरी- सेव्ह ताडोबा' मोहिमेला पाठिंबा

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०१, चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प ते उमरेड-पवनी-गडचिरोली या ताडोबाच्या पूर्व व उत्तर दिशेकडील महत्वाच्या व्याघ्र भ्रमणमार्गातील लोहरडोंगरी येथील प्रस्तावित खाण रद्द करण्यासाठी व वन्यजीव प्रेमींनी पुकारलेल्या मोहिमेला आता जनआंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. 'स्टॉप लोहरडोंगरी माईन- सेव्ह ताडोबा- ब्रम्हपुरी टायगर कॅारिडॅार' या नावाने सुरु असलेल्या ऑनलाईन मोहिमेत १० हजार स्वाक्षऱ्यांचा टप्पा ओलांडला असून, चंद्रपूरसह देशभरातून पाठिंबा मिळत आहे.

राज्य वन्यजीव मंडळाने जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात वाघांच्या भ्रमणमार्गातील या खाणीला मंजुरी दिली. तज्ज्ञ सदस्यांचा विरोध डावलून वाघांचा अधिवास तोडणाऱ्या या लोहखनिज खाणीला मंजुरी प्रदान करण्यात आली. या प्रकल्पासाठी ३५.९४ हेक्टर आरक्षित वनक्षेत्रातील तब्बल १८,०२४ झाडे तोडली जाणार आहेत. तसेच ब्रम्हपुरी वनविभागातील जंगल घोडाझरी अभयारण्यालगत असून, येथे ६० पेक्षा अधिक वाघांचा वावर आहे. व्याघ्र कॅारिडोर नष्ट झाल्यास व्याघ्र संवर्धनाला मोठा तडा बसणार आहे.

गेल्या पाच वर्षात जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २०० हून अधिक नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. खाण प्रकल्पामुळे जंगलाचे तुकडे होणार असून, वाघ व बिबटे मानवी वस्तीच्या अधिक जवळ येतील. परिणामी हा संघर्ष अधिक भीषण होण्याची भीती आहे. मागील २०२५ या एका वर्षात जिल्ह्यात मानव-वन्यप्राणी संघर्षात ४७ जणांचा बळी गेला असून, १८ मृत्यू ब्रम्हपुरी वनविभागात आहे. त्यामुळे भविष्यातील आपत्ती टाळण्यासाठी जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी या ऑनलाईन स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होऊन आपला विरोध नोंदवावा, असे आवाहन पर्यावरणवादी व वन्यजीव प्रेमींच्या वतीने करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## महिलांच्या सक्षम सबलीकरणासाठी भाजपाच्या पाठीशी उभे रहा - आ.वाघ



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०१, पाटण (सातारा) :** गोकुळ तर्फ पाटण (कोयना) पंचायत समिती गणातील भाजपच्या उमेदवार वैशाली बबन कांबळे या सुशिक्षित आणि अभ्यासू आहेत. त्यांच्या वक्तृत्वावरुन त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव दिसते. कोयना विभागातील दुर्गम भागातील समस्यांची जाणीव दिसते. पंचायत समितीच्या माध्यमातून त्या नक्कीच कोयना विभागातील समस्यांची चांगल्या प्रकारे सोडवणूक करतील असा विश्वास व्यक्त करुन महिलांच्या सक्षम सबलीकरणासाठी भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षा आमदार चित्राताई वाघ यांनी कोयना येथे बोलताना केले.

गोकुळ तर्फ हेळवाक पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार वैशाली बबन कांबळे यांच्या प्रचारार्थ कोयना येथे झालेल्या सभेत आ. चित्राताई वाघ बोलत होत्या त्या पुढे म्हणाल्या भाजप हा एकमेव असा पक्ष आहे तो महिलांच्या प्रगतीसाठी नेहमी प्रयत्न करतो. महिलांच्या प्रगतीसाठी विविध योजना राबवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा नेहमीच प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून होत असतो. महिला स्वावलंबी झाली की घर, राज्य, देश, राष्ट्र स्वावलंबी व्हायला वेळ लागणार नाही. दुर्गम अशा कोयना विभागात महिलांच्या समस्या अद्याप सुटलेल्या दिसत नाहीत. महिलांच्या समस्या सुटल्या की ऑपऑप कुटुंबातील सर्वांच्या समस्या सुटतात म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता व आत्मनिर्भरतेचा संकल्प महिला सबलीकरणाचे व्हिजन समोर ठेवले आहे. असे सांगताना आ.चित्राताई वाघ पुढे म्हणाल्या या मतदारसंघात विकास कामांच्या नावाखाली निकृष्ट कामे व वाढता भ्रष्टाचार याबाबत मतदार संघात समोर आलेली वास्तव स्थिती मांडली अशा भ्रष्ट प्रवृत्ती विरोधात महिला भगिनींनी जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी याज्ञेसिंह पाटणकर, ऐश्वर्यादेवी पाटणकर, वैशाली कांबळे, दत्तात्रय (बाळासाहेब) कदम, राजाभाऊ शेलार, नंदकुमार सुर्वे, बबन कांबळे, पंकज गुरव, सचिन कदम, विलास काटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने मोठ्या संख्येने गोकुळ तर्फ हेळवाक कोयना विभागातील महिला, नागरिक उपस्थित होते.

## विकसित भारताच्या यात्रेला गती देणारा, नवभारताच्या आत्मविश्वासाचे प्रतिबिंब असलेला अर्थसंकल्प - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०१, चंद्रपूर :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या यात्रेला गती देणारा, देशाच्या आकांक्षा आणि नवभारताचा आत्मविश्वास स्पष्टपणे प्रतिबिंबित करणारा असल्याची ठाम प्रतिक्रिया आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक, कामगार, मध्यमवर्ग तसेच लघु व मध्यम उद्योगांना केंद्रस्थानी ठेवत, देशाच्या आर्थिक बळकटीसाठी दूरदृष्टीपूर्ण आणि निर्णायक पावले उचलण्यात आली आहेत. हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला अधिक बळ देणारा असून, देशाच्या सर्वांगीण विकासाचा ठाम रोडमॅप मांडणारा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम, निर्णायक आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली आज भारत केवळ देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक पातळीवरही आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक दृष्ट्या भक्कम स्थान मिळवून उभा आहे.

जागतिक व्यासपीठावर भारताचा आवाज आता दुर्लक्षित करता येणार नाही, ही वस्तुस्थिती या अर्थसंकल्पातून अधिक ठळकपणे दिसत आहे. कृषी क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदींमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार असून, ग्रामीण भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा सरकारचा स्पष्ट संकल्प या अर्थसंकल्पातून दिसून येतो. एमएसएमई क्षेत्रासाठी १० हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद करून लघु व मध्यम उद्योगांना नवसंजीवनी देण्यात आली असून, यामुळे रोजगारनिर्मितीचा वेग मोठ्या प्रमाणात वाढेल, असे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी 'शी-मार्ट्स' आणि स्वयं-सहायता गटांसाठी 'उद्योजक मार्ट्स' स्थापन करण्याचा निर्णय हा महिला सक्षमीकरणापुरता मर्यादित न राहता, महिलांना आर्थिक नेतृत्व देणारा ठोस निर्णय आहे. शेती व पीक उत्पादन वाढवण्यासाठी एआय आधारित टूल्सचा वापर करून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा सरकारचा निर्धार या अर्थसंकल्पातून स्पष्ट होतो.

पशुपालनासाठी कर्ज-संबंधित अनुदान योजना, मत्स्यपालनाला चालना देण्यासाठी ५०० नवीन जलाशयांची उभारणी, तसेच समावेशक विकासावर भर देत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा निर्णय हा ग्रामीण भागांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड ठरेल. १५,००० माध्यमिक शाळांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब, २०३० पर्यंत २० लाख कुशल व्यावसायिकांची निर्मिती आणि कॅन्सरवरील १७ औषधांच्या किमती कमी करण्यासारखे निर्णय हे सामाजिक न्याय आणि लोकहिताचा सरकारचा स्पष्ट अजेंडा दर्शवतात. 'विकसित भारत' हे केवळ स्वप्न नसून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ते प्रत्यक्षात साकार होत आहे. त्या दिशेने टाकलेले हे ठोस, निर्णायक आणि ऐतिहासिक पाऊल असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी ठामपणे सांगितले.